# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
चौथा मजला, काकडे बीज आयकॉन, पुणेविद्यापीठ रोड, अशोक नगर ई-स्क्वेअर जवळ, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०-२५६३०२३५
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाइट : www.srapune.gov.in


४१० 
09/08/2022

जा.क्र. झोपुप्रा/तां.३/भोप्र/मा.क्र.२३०/१२२३ /२०२२
दि. /०८/२०२२
09/08/2022

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) मूळ बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा/५७१/२०१७ दि. २७/०४/२०१७.

२) दुरूस्त बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा/३७९/२०२१ दि. ०१/०३/२०२१.

३) दुरूस्त बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा/२२१०/२०२१ दि. १०/१२/२०२१.

४) विकसक यांचे अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा विनंती अर्ज (आ.क्र १६८६ दि २९/०७/२०२२).

५) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि. /०८/२०२२.

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे सि.टी.एस.नं. १०४५ नाना पेठ, पुणे येथिल झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील (पुनर्वसन) इमारतीस या कार्यालयाकडून क्रमांक जा.क्र. झोपुप्रा/५७१/२०१७ दि. २७/०४/२०१७ अन्वये मुळ बांधकाम परवानगी व जा.क्र. ३७९ दि. ०१/०३/२०२१ नुसार दुरूस्त बांधकाम परवानगी देणेत आली आहे. तसेच जा.क्र.२२१० दि. १०/१२/२०२१ रोजी द्वीतीय बांधकाम परवानगी देणेत आली आहे. द्वीतीय बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीचे काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील दुकानांसाठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत विकसक मे.प्राईड अमन असोसिएट्स यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार पुनर्वसन इमारतीस अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मा.मु.का.अ. यांचेकडील मान्यतेनुसार देणेत येत आहे.

बिल्डिंग - (पुनर्वसन + विक्री घटक) Composite

| अ.क्र | मजले | सदनिका क्र. | सदनिका/दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | सदनिका/दुकान क्र. (विक्री घटक) | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|---|
| १) | लोअर ग्राउंड फ्लोअर | स्टोअर रूम १ ते २ | Ramp + पार्किंग | स्टोअर रूम ०१, ०२ | ०२ स्टोअर रूम |
| २) | अप्पर ग्राउंड फ्लोअर | शॉप क्र. २३ व २५ | -- | शॉप क्र. २३,२५ | ०२ शॉप्स |
| ३) | सातवा मजला | Refuge area | Refuge area | Refuge area | Refuge area |

पुनर्वसन इमारत - Refuge area

विक्री घटक -

स्टोअर रूम - ०२ स्टोअर रूम
शॉप - ०२ शॉप्स्
Refuge area - Refuge area

---

एकुण - ०२ स्टोअर रूम + ०२ शॉप्स + Refuge area

एकुण पुनर्वसन व विक्री घटक = ०२ स्टोअर रूम + ०२ शॉप्स + Refuge area

अटी :-

१) प्रस्तुत बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्या बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) विषयांकित योजना रस्तारुंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, उर्वरित टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

६) इमारतीचे सर्व सिमा भिंत बांधकाम, वृक्ष लागवड करणे अंतिम भोगवटा मागणीपूर्वी पूर्ण करून सामासिक अंतराचे संपूर्ण क्षेत्र खुले ठेवणे बंधनकारक आहे.

७) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

८) सदर योजनेसाठी लागू होणारे शुल्क, जसे देखभाल खर्च, आणि पायाभूत सुविधा शुल्क (उर्वरीत ५०% रक्कम) भोगवटापत्र दिल्यापासून एक महिन्यामध्ये आणि टी.डी.आर. मागणीपूर्वी अदा करणे आवश्यक आहे.

९) मंजूर नकाशा जा.क्र. झोपुप्रा / २२१०/ २०२१ दि. १०/१२/२०२१ नुसार ७व्या मजल्यावर Refuge Area प्रस्तावित आहे.

१०) अतिरिक्त (विक्री घटक) क्षेत्राबाबतचा मोबदला विकसक यांनी त्यांचे जबाबदारी व तसेच भविष्यात या संदर्भात कोणतीही अडचण उद्भवल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी विकसक आणि वास्तु विशारद यांची राहिल. तसेच या संदर्भात झोपुप्रा, पुणे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

११) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील खुली जागा आणि सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

प्र. सहाय्यक संचालक नगररचना
झो.पु.प्रा., पुणे.

प्रत :- १) मे.प्राईड अमन असोसिएट्स
५वा मजला, ऑफिस नं. ५२०, अरोरा टॉवर्स, ईस्ट विंग, एम.जी.रोड, कॅम्प, पुणे

२) **वास्तुविशारद** प्राईड डिझायनर्स, ५वा मजला, ऑफिस नं. ५२०, अरोरा टॉवर्स, कॅम्प, पुणे.

३) **तहसिलदार, ताबा विभाग,** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

४) **संगणक अधिकारी,** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.